आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. HVTO/ ६८५
दिनांक – ११/०९/२०२५

जाहीर निवेदन

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये स्वता:च्या अथवा भाड्याच्या जागेवर डॉग पाँड उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन असून ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मान्यताप्राप्त संस्थाकडून खाजगी अथवा भाड्याच्या जागे मध्ये इन्फ्रास्ट्रक्चर उभारून भटक्या व मोकाट श्वानाची नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी ०५ वर्ष कालवधीसाठी + ०२ वर्ष मुदतवाढ गुणवत्तेच्या आधारे या कालावधीसाठी खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून नसबंदी शस्त्रक्रियासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

- प्रस्तावित अटी व शर्ती पुढीलप्रमाणे –

१. ॲनिमल वेलफेयर बोर्ड ऑफ इंडियाचे सदर संस्थेकडे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
२. ॲनिमल वेलफेयर बोर्ड ऑफ इंडियाच्या दि.२७/०५/२०२२ च्या परिपत्रकानुसार सदर संस्थेने नूतनीकरण करण्याबाबतची पूर्तता करणे आवश्यक आहे.
३. मागील ०५ वर्षात सदर पात्र संस्थेने असा स्वरूपाचे किमान र.रु २.५० कोटीचे किमान १ काम, अथवा किमान १.५० कोटीचची २ कामे अथवा किमान १.२५ कोटीचे ३ कामे केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
४. ॲनिमल वेलफेयर बोर्ड ऑफ इंडियाच्या सन २०२३ च्या मार्गदर्शक सूचना नुसार पात्र संस्थांना मागील असलेल्या अनुभवासाठी ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोजेक्ट रेक्नायजेशन असणे आवश्यक आहे.
५. पात्र संस्थेची मागील ०५ वर्षातील कमाल वार्षिक उलाढाल कमीत कमी रक्कम रुपये २.२५ कोटी असणे आवश्यक आहे.
६. पात्र संस्थेची बीड कॅपेसिटी किमान रक्कम रुपये ३ कोटी असावी.
   (A X N X 1.5 - B)
   A = Maximum Turnover in last five years (As per current rate)
   N = Time limit in Year
   B = Value of Work in Hand
७. दि.५/४/२०२२ रोजीच्या ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रका नुसार ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रका नुसार भटके व मोकाट श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करण्यासाठी र.रु.१४५०/- प्रति.श्वान हा दर निश्चित केला आहे. व भटक्या व मोकाट श्वान नसबंदी शस्त्रक्रियेसाठी पकडणे व शस्त्रक्रिये नंतर पुन्हा त्याच जागेवर सोडणे यासाठी रु २००/- प्रती श्वान असा एकूण १६५०/- रुपये खर्च निश्चित केला असून त्याप्रमाणे देयक अदा करण्यात येईल.
८. पुणे मनपाच्या हद्दीतील भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे.
९. ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोजेक्ट रेक्नायजेशन चे स्वतंत्र परवानगी प्रमाणपत्र ०६ महिन्यात पुणे महानगरपालिकाकडे सादर करणे आवश्यक आहे . प्रमाणपत्र वेळेत न सादर केल्यास कामाची वर्क ऑर्डर रद्द करण्यात येईल व ०६ महिन्याचे कोणतेही बिल अदा करण्यात येणार नाही.

१०. खाजगी संस्थेने उभारलेले इन्फ्रा नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यासाठी उभारण्यात आलेले पिंजरे, जागा हि ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या निकषाप्रमाणे असणे आवश्यक असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशु संवर्धन विभागा SPCA यांच्या कडून ३० दिवसात प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

११. Animal Birth Control (Dog) चे काम करणाऱ्या सर्व संस्थांनी मनपाने प्रमाणित केलेले मोबाईल App वापरणे बंधनकारक राहील.

१२. भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया,औषधोपचार खर्च, अँटी रेबीज लसीकरण करणे तसेच मनपा आरोग्य कार्यालय पशु वैद्यकीय विभागाने निवडलेले बेल्ट अथवा मायक्रोचीप बसवणे अथवा निवडलेले ॲप वापरणे बंधनकारक राहील. तसेच सेवकवर्गाच्या वेतनावर होणारा संपूर्ण खर्च, वाहन खर्च, इंधन खर्च करण्याची जबाबदारी नियुक्त होणाऱ्या संस्थेची राहील याकरिता पुणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही .

१३. खाजगी अशासकीय संस्थाकडून पुणे महानगरपालिका हद्दीत उपयोगात आणणाऱ्या वाहनांना GPS लावणे बंधनकारक आहे

१४. सदर पात्र ठरणाऱ्या संस्थाचे खाजगी इन्फ्रास्ट्रक्चर पुणे महानगरपालिका हद्दीत अथवा हद्दीजवळ असावे (ग्रामीण भागात असल्यास ग्राम पंचायत नाहरकत प्रमाणपत्र सोबत जोडावे.)

१५. पात्र ठरणाऱ्या संस्थेना मनपाच्या आवश्यकतेनुसार व नियोजनाप्रमाणे नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे काम वाटून दिले जाईल

१६. संस्थेच्या कामावर आरोग्य खात्याचे नियंत्रण राहील .

१७. पात्र संस्थेकडे ०१ रुग्ण वाहिका असणे आवश्यक आहे.

१८. पुणे मनपा हद्दीतील भटक्या आजारी कुत्र्यासाठी १० पिंजरे रिकामे ठेवणे बंधनकारक आहे.

१९. सदर पात्र ठरणाऱ्या सर्व संस्थाना जागतिक Zoonosis Day व जागतिक रेबीज डे या दिवशी मोकाट व भटक्या श्वानांना मोफत लसीकरण करणे बंधनकारक राहील त्या साठी पुणे महानगरपालिका कोणतेही रक्कम अदा करणार नाही.

२०. वरील अटी व शर्तींचा भंग झाल्यास सदर संस्थेला देण्यात आलेले काम अथवा करण्यात आलेला करारनामा रद्द करण्याचे अथवा काम काढून घेण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना आहेत.

२१. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

तरी उपरोक्त अटी व शर्तीस अधीन राहून काम करणाऱ्या ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मान्यताप्राप्त संस्थांनी आपले योग्य त्या कागदपत्रासह (AWBI प्रमाणपत्र, ३ वर्षाचे फायनान्शियल रिपोर्ट, अनुभव प्रमाणपत्र , जागा मालकीचे कागदपत्र (७/१२ अथवा खरेदी खत प्रत) जागा भाड्याची असल्यास रजिस्टर भाडे करार,(नोटरी करारनामा ग्राह्य धरला जाणार नाही) ग्रामपंचायत ना हरकत दाखला इत्यादी सर्व कागदपत्रे प्रस्ताव आरोग्य अधिकारी यांचे नावे आरोग्य कार्यलय,३ रा मजला या ठिकाणी दि 23/e/२०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद पाकिटात समक्ष सादर करावेत.

डॉ.निना बोराडे
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका